# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४

---

क्र.कोविमं/उमा.प्रात्य./तोंडी/श्रेणी/ 4136
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक : ०८/०२/२०२३.
१०

प्रति,
प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२३ च्या प्रात्यक्षिक / तोंडी / प्रकल्प परीक्षेसाठी विलंबाने आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र **फेब्रुवारी / मार्च २०२३** च्या परीक्षेस खास बाब म्हणून शासनाकडून कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, यास्तव लेखी परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत परीक्षेचे आवेदनपत्र मंडळात जमा करून त्या विद्यार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

दिनांक २८/०१/२०२३ रोजी प्रात्यक्षिक / तोंडी / श्रेणी परीक्षेचे साहित्य व O.M.R. गुणतक्ते सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना वितरीत करण्यात आले आहेत. तथापि काही विद्यार्थ्यांनी उशीरा आवेदनपत्र भरल्यामुळे O.M.R./ श्रेणी गुणतक्त्यामध्ये त्यांचे बैठक क्रमांक उपलब्ध झालेले नाहीत. **तरी अशा विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक / तोंडी / श्रेणी विषयाची परीक्षा विहीत मुदतीत घेवून त्यांचे गुण / श्रेणी ही कनिष्ठ महाविद्यालयाच्या लेटर हेडवरती कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक (ठळक व मोठया अक्षरात), बैठक क्रमांक, विषयाचे नाव, विषय कोड क्रमांक, गुण / श्रेणी यांची नोंद करण्यात यावी व शेवटी विषय शिक्षक / अंतर्गत / बहिस्थ परीक्षक यांची स्वाक्षरी घ्यावी. तसेच कॉलेजचा शिक्का मारून त्यावरती प्राचार्याची स्वाक्षरी घेवून सदर गुणतक्ता O.M.R. गुणतक्त्यांच्या पाकिटात समाविष्ट करण्यात यावा.** याबाबत असे निदर्शनास आले आहे की, उशीरा / अतिविलंब शुल्काने आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रात्य / तोंडी / श्रेणी परीक्षेचे गुण / श्रेणी मुदतीत कळविले जात नाहीत व मंडळाकडून दूरध्वनीद्वारे विचारणा केल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचे गुण / श्रेणी कळविले जातात ही बाब योग्य नाही. तरी उपरोक्त सूचनेनुसार निर्धारीत मुदतीत गुण / श्रेणी कळविले नाही तर विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहील.

तरी सर्व साहित्य **दिनांक २२/०२/२०२३** रोजी वितरण केंद्रावर जमा करावे. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील आवेदन पत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रात्य / तोंडी / श्रेणी परीक्षा घेतली असल्याची खात्री करावी. कोणत्याही विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली नाही किंवा गुण / श्रेणी देण्याचे राहून गेले अशी कोणतीही तक्रार करता येणार नाही. तरी वरील दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(डी. एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर